जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २३६ | रविवार, २२ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


**संक्षिप्त**

### कुंडी खरेदीवरून वाद; तिघांचा व्यापाऱ्यावर हल्ला

**पिंपरी, ता. २१ :** कुंडी खरेदीच्या कारणावरून झालेल्या वादातून व्यापाऱ्यावर तिघांनी हल्ला केला. या हल्ल्यात व्यापारी गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी (ता. १७ ) रोजी संध्याकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास चऱ्होली परिसरात घडली. ऋषिकेश विठ्ठल तापकीर (वय-२५, रा. वडमुखवाडी, पुणे) व त्याचे दोन साथीदार (नाव, पत्ता माहिती नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपी अशी आरोपींची नावे आहेत. राजेश चिमाजी वामन (वय-४५, रा. चऱ्होली बु., पुणे) असे जखमी व्यापाऱ्याचे नाव असून त्यांनी मंगळवारी (ता. १७) याबाबत दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास आरोपी कुंडी खरेदी करण्यासाठी दुकानात आले होते. कुंडी कमी दरात देण्याच्या कारणावरून वाद झाला. यावेळी आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करत कुंडीने डोक्यात मारहाण केली व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

# लोणी काळभोर ग्रामपंचायतीला पाटबंधारे विभागाची नोटीस

## नदीपात्रातच कचरा टाकल्याप्रकरणी कायदेशीर कारवाईची टांगती तलवार

**लोणी काळभोर, ता. २१ :** मुळा-मुठा नदीच्या पात्रात सर्रास कचरा टाकून पर्यावरणाची उघडपणे पायमल्ली केल्याप्रकरणी लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायतीला पाटबंधारे विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावत चांगलेच धारेवर धरले आहे. नदीकाठावर प्लास्टिक, बांधकामाचा मलबा आणि हॉटेलमधील कचरा टाकून ग्राम पंचायतीने नदीपात्रालाच कचरा डेपो बनवला आहे. असा गंभीर आरोप करून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी १६ मार्चला लोणी काळभोर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

या नोटीसमध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्यासोबतच काही ठिकाणी तो जाळण्याचे प्रकारही आढळून आले. त्यामुळे परिसरातील हवा व पाण्याचे प्रदूषण वाढत असून नागरिकांच्या



आरोग्यावर थेट परिणाम होत आहे. अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, या बेकायदेशीर कचरा टाकण्यामुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह अडथळित होण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाळ्यात हा कचरा प्रवाहासोबत पुढे वाहून जाऊन धरणाच्या कामकाजावर तसेच संपूर्ण नदी परिसंस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीला तातडीने कचरा टाकणे थांबवून वैज्ञानिक पद्धतीने कचरा व्यवस्थापन राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सूचना पाळल्या नाहीत, तर सिंचन कायदा, प्रदूषण नियंत्रण नियम आणि धरण सुरक्षा अधिनियमांतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा विभागाने दिला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीसमोर आता प्रशासकीय तसेच कायदेशीर संकट उभे ठाकले आहे.

दरम्यान, भूमिअभिलेख विभागाने केलेल्या स्वतंत्र सर्वेक्षणात संबंधित जागा ही संरक्षित नदीपात्र क्षेत्रात येत असल्याचे निष्पन्न झाले आहे. हा अहवाल तहसीलदारांकडे सादर करण्यात आला असून अतिक्रमण व बेकायदेशीर कचरा टाकण्यावर कारवाईची प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची शक्यता आहे. नदी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेकडूनच नदीपात्रात कचरा टाकला जात असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा सवाल उपस्थित झाले आहेत.

> नदीकाठच्या जागेत कोणत्याही प्रकारे विनापरवानगी घनकचऱ्याचे संचयन करणे कायद्याने प्रतिबंधित आहे. कचऱ्याला लागणाऱ्या आगीच्या घटनांची गंभीर दखल घेत तातडीने आग नियंत्रण कक्ष स्थापन करावा आणि अशा गैरकृत्यांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करणे संबंधित संस्थांची जबाबदारी आहे. तसेच, या निष्काळजीपणामुळे परिसरातील नागरिक व संस्थांमधील कर्मचारी यांच्या आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, याचीही विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, महाराष्ट्र जलप्रदूषण नियंत्रण अधिनियम, धरण सुरक्षा कायदा आणि इतर संबंधित दंड संहितांनुसार संबंधितांविरुद्ध योग्य त्या न्यायिक मंचावर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल.
> - **पल्लवी जोशी,** (शाखाधिकारी - लोणी काळभोर पाटबंधारे विभाग)

### विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश

नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला आग लागल्यानंतर एमआयटीच्या विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन छेडले. अनेक दिवसांपासून सुरू असलेले हे आंदोलन अजूनही सुरूच असून विद्यार्थी रस्त्यावर उतरून प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत आहेत. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण संघर्षामुळे शासनाने दखल घेत नदीपात्रात कचरा टाकण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यावरण रक्षणासाठी विद्यार्थ्यांनी उचललेले हे पाऊल आता जनआंदोलनात रूपांतरित होत असून त्यांच्या लढ्याला यश मिळाले आहे.

> मागील दहा ते बारा दिवसांपासून गावातील कचरा उचलला गेलेला नाही. त्यामुळे लोणी काळभोर परिसरातील ५० हजारांहून अधिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर धोका निर्माण झाला आहे. सध्या ग्रामपंचायत सरकारी गट क्रमांक ११३ मध्ये कचरा टाकत असून, या जागेची अधिकृत मोजणी झाल्यानंतर संबंधित वादाचा कायमस्वरूपी तोडगा निघेल. जुन्या नकाशानुसार एमआयटीने बुजवलेले ओढे, रस्ते आणि वाढता कचऱ्याचा प्रश्न यावर ठोस निर्णय घेण्यासाठी २३ मार्च रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पाटबंधारे विभागाने लोणी काळभोर, कदमवाकवस्ती तसेच एमआयटी प्रशासनालाही कारणे दाखवा नोटीस बजावणे आवश्यक आहे, अशी आमची ठाम भूमिका आहे.
> - **नागेश काळभोर,** (प्रशासक, लोणी काळभोर, ता. हवेली)

# क्रिकेट स्पर्धेतील वादातून थेट गोळीबार; दोघे जण जखमी, परस्परविरोधी गुन्हे दाखल

**योगेश मारणे**

न्हावरे, त. २१ : शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथील भैरवनाथ क्रिकेट ग्राउंडवर किरकोळ वादातून उसळलेल्या संघर्षाने थेट गोळीबाराचे रूप घेतल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.या धक्कादायक घटनेत दोघेजण जखमी झाले असून,परस्परविरोधी फिर्यादींवरून शिरूर पोलीस ठाण्यात दोन्ही गटांतील आरोपींविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,नुकत्याच पार पडलेल्या मांडवगण फराटा गावातील यात्रेनिमित्त लावलेल्या बॅनर तसेच क्रिकेट स्पर्धेच्या पोस्टरवर फोटो लावण्याच्या कारणावरून सुमारे दहा ते बारा दिवसांपूर्वी दोन्ही गटांमध्ये वाद झाला होता. हा वाद मिटवण्यासाठी गुरुवारी (ता. १९) सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास संबंधित दोन्ही गट भैरवनाथ क्रिकेट ग्राउंडवर एकत्र आले. मात्र, चर्चा सुरू असतानाच वातावरण तापले आणि वादाने हिंसक वळण घेतले. अक्षय गोविंदा पाटील (वय २९, रा. तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि.पुणे) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, अमोल आनंदा चौगुले,राहुल सुदाम गिऱ्हे आणि संदीप तेलंग (सर्व रा. मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी वाद घालत दमदाटी केली. यावेळी संदीप तेलंग याने पिस्तूल काढून पाटील यांच्या दिशेने रोखले. झटापटीदरम्यान गोळी सुटून ती अमोल चौगुले याच्या हाताला लागली. त्यानंतर चौगुले याने पिस्तूल हिसकावून घेत अक्षय पाटील याच्या दिशेने गोळीबार केला. यात अक्षय पाटील याच्या उजव्या बरगडीला गोळी लागून तो जखमी झाला.

तर दुसऱ्या बाजूने मिथुन उर्फ अमोल आनंदा चौघुले (वय ३१) याने दिलेल्या फिर्यादीनुसार,अक्षय पाटील व त्याच्या साथीदारांनी पिस्तुलातून जीवघेणा गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. गोळीबारानंतर चौघुले व त्याचे मित्र जीव वाचवण्यासाठी पळत असताना, काही जणांनी दगडफेक व शिवीगाळ केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी सुत्रधार शिंदे,ऋतिक चव्हाण, योगेश मचाले, दिगंबर शेंडकर, मिनीनाथ गव्हाणे याच्यासह काही अनोळखी व्यक्तींविरुद्धही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शिरूर पोलिसांनी दोन्ही फिर्यादींवरून विविध गंभीर कलमांच्या अंतर्गत तसेच आर्म ॲक्ट आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हे नोंदवले आहेत.

### बेकायदेशीर पिस्तुलांचा सुळसुळाट

शिरूर तालुक्यासह ग्रामीण भागात बेकायदेशीर पिस्तुलांची वाढती उपलब्धता ही चिंतेची बाब ठरत आहे.किरकोळ कारणांवरून थेट गोळीबारासारख्या गंभीर घटना घडत असल्याचे चित्र समोर येत आहे. युवकांमध्ये वाढती आक्रमकता आणि शस्त्रांचा सहज वापर यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम राबवून बेकायदेशीर शस्त्रसाठ्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे असून,नागरिकांनीही संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# डोर्लेवाडी–झारगडवाडीत शंभू महादेवाच्या कावडीची उभारणी व ग्रामप्रदक्षिणा

**डोर्लेवाडी, ता. २१ :** गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी आणि झारगडवाडी या गावांमध्ये श्रद्धेचे प्रतीक असलेल्या शंभू महादेवाच्या कावडीची पारंपरिक पद्धतीने उभारणी करण्यात आली. ढोल-ताशांच्या कडकडाटात आणि 'महादेव-पार्वती'च्या जयघोषात निघालेल्या भव्य ग्रामप्रदक्षिणेमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूर येथील यात्रेला गुढीपाडव्यापासून प्रारंभ होतो. या यात्रेचे मुख्य आकर्षण असलेली ही कावड उंबराच्या झाडाच्या लाकडापासून आणि बांबूच्या शिडीपासून बनविली जाते. साधारणपणे २५० ते ३०० किलो वजन असलेल्या या कावडीवर भगवी



पताका, वणगाईच्या शेपटीचे गगवन आणि जलाभिषेकासाठी तांब्याचे दोन मोठे गडू जोडलेले असतात.

शिव-पार्वती हळदी सोहळा गुढीपाडव्यापासून पाचव्या दिवशी यात्रेला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. अष्टमीला खापूसवाडी येथील भाविकांकडून आणलेला पोशाख अर्पण करून तो शिखरावर बांधला जातो. रात्री १२ वाजता शंकर-पार्वती विवाह सोहळा मोठ्या थाटात पार पडतो. दशमी-एकादशीला इंदूरच्या ग्वाल्हेर घराण्यातील राजाच्या हस्ते महापूजा व अभिषेक पार पडतो, ज्याला यात्रेत प्रथम मान दिला जातो.

दरम्यान, यात्रेतील सर्वात महत्त्वाचा आणि अंगावर शहारे आणणारा क्षण म्हणजे 'द्वादशी'चा मुंगी घाट सोहळा. पुणे जिल्ह्यातील म ानाच्या कावड्या कऱ्हा नदीचे पवित्र जल घेऊन अत्यंत अवघड असा मुंगी घाट चढून शिंगणापूरकडे प्रस्थान करतात. हा थरार अनुभवण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक गर्दी करतात. मुंगी घाट पार केल्यानंतर मध्यरात्री शंभू महादेवाला कऱ्हा जलाचा अभिषेक घातला जातो आणि यात्रेची सांगता होते.

# घराच्या वाटणीसाठी मुलाकडून आई–वडिलांना मारहाण

## मुलगा व सुनेविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**दौंड, ता. २१ :** घराच्या वाटणीसाठी आई-वडिलांना मुलगा आणि सुनेने शिवीगाळ करत काठीने बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुलगा व सुनेवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना सोमवारी (ता. १६) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास नायगाव ता. दौंड येथे राहते घरासमोर घडली.

अमोल संजय काळे, प्रियंका अमोल काळे (रा. दोघे रा. नायगाव ता. दौंड) असे मारहाण करणाऱ्या मुलाचे व सुनेचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी मुलाची आई मालन संजय काळे (वय ५०, रा. नायगाव) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दौंड पोलिसांनी आरोपी मुलगा आणि सुनेवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मालन काळे या त्यांचे पती संजय काळे यांच्यासह सोमवारी (ता. १६) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घरासमोर थांबल्या होत्या. यावेळी त्यांचा शेजारी राहणारा मुलगा अमोल व सून प्रियंका तिथे आले. अमोलच्या हातात लाकडी काठी होती.

मुलगा अमोल याने मला तुम्ही राहत असलेल्या घरात राहण्यासाठी हिस्सा द्या, अशी मागणी केली. त्यावर आईने त्याला समजावून सांगताना म्हटले की, तुला राहण्यासाठी आजीचे घर दिले आहे, आता हे घर तुला दिले तर आम्ही कुठे राहणार?यामुळे अमोलने आई-वडिलांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी अमोलने आपल्या हातातील लाकडी काठीने वडील संजय काळे यांच्या डोक्यात, पाठीवर आणि हातावर जोरात प्रहार केले. पतीला वाचवण्यासाठी मालन काळे मध्ये पडल्या असता, मुलगा व सून प्रियंका या दोघांनी त्यांनाही हाताने बेदम मारहाण केली. तुम्हाला बघून घेतो, जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देऊन आरोपी तिथून पसार झाले.

याप्रकरणी मालन काळे यांनी दौंड पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली आहे. पोलिसांनी आरोपी अमोल काळे आणि प्रियंका काळे यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार म्हेत्रे करत आहेत.

# आमच्याच संलग्न लॅबमध्ये चाचण्या करा

## पूर्व हवेलीत रुग्णालयांकडून कमिशनच्या आमिषापोटी रुग्णांच्या जीवाशी आणि खिशाशी खेळ

**लोणी काळभोर, ता. २१ :** देवानंतर डॉक्टरांना मानाचे स्थान दिले जाते. मात्र पूर्व हवेली परिसरात काही खाजगी रुग्णालयांकडून ३० ते ४० टक्के कमिशनच्या आमिषापोटी रुग्णांच्या जीवाशी आणि खिशाशी खेळ सुरू असल्याचे गंभीर आरोप पुढे येत आहेत. उजढ (कमिशन ऑन टेस्ट) या नावाखाली रुग्णांवर अनावश्यक वैद्यकीय चाचण्यांचा मारा केला जात असल्याने आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे.

रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाल्यानंतर रुग्णांच्या हातात तात्काळ विविध चाचण्यांची मोठी यादी दिली जाते. रक्त, लघवी, साखर, एचआयव्ही, इसीजी, एक्स-रे, सोनोग्राफी अशा अनेक तपासण्या केवळ आमच्याच संलग्न

पुणे प्राईम न्यूज पंचनामा

लॅबमध्ये करा अशी सक्ती केली जाते. बाहेरील लॅबचे स्वस्त व विश्वासार्ह अहवाल सादर केले तरी ते स्वीकारण्यास नकार दिला जातो. यामागे कमिशनचा खेळ असल्याची चर्चा आरोग्य क्षेत्रात सुरू आहे. दरम्यान, पूर्व हवेलीतील या कथित कमिशन ऑन टेस्ट प्रकरणा मुळे एक गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रुग्णांनी उपचारासाठी डॉक्टरांवर विश्वास ठेवावा की आधी बिलांचा विचार करावा? आरोग्य सेवेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाबाबत आता प्रशासनानेच ठोस भूमिका घेण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

### रुग्णांनी काय काळजी घ्यावी?

- महागड्या किंवा अनेक चाचण्यांपूर्वी सेकंड ओपिनियन घ्या.
- चाचण्यांचे लिखित कारण मागण्याचा रुग्णांना कायदेशीर अधिकार आहे.
- विविध लॅबचे दर तपासा व अहवाल स्वीकारला जाईल का याची आधी खात्री करा.
- शंका असल्यास जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा वैद्यकीय परिषदेकडे तक्रार नोंदवा.

अनावश्यक चाचण्यांचा आर्थिक फटका वैद्यकीयदृष्ट्या तातडीची गरज नसतानाही इमर्जन्सीच्या नावाखाली १ ते ५ हजार रुपयांपर्यंतच्या चाचण्या रुग्णांवर लादल्या जात असल्याचे समोर आले आहे. आधीच आजारपणा मुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना या अतिरिक्त खर्चामुळे मोठा मानसिक व आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. उपचारासाठी धाव घेतलेल्या रुग्णांनाच बिलांच्या ओझ्याखाली दबून जावे लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

**आरोग्य सेवा की नफेखोरीचा उद्योग?**

रुग्णाला दिलासा देण्यासाठी असलेली आरोग्य सेवा काही ठिकाणी सरळ नफेखोरीचे साधन बनत असल्याचे चित्र या प्रकारातून स्पष्ट होत आहे. डॉक्टर आणि काही लॅब यांच्यातील कथित आर्थिक व्यवहारामुळे प्रत्येक चाचणीमागे कमिशन मिळत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यामुळे कमिशन ऑन टेस्ट म्हणजे कमिशनचा संगनमताने चालणारा प्रकार आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या गंभीर प्रकारांबाबत आरोग्य प्रशासनाने अद्याप ठोस कारवाई न केल्याने रुग्णालयांची मनमानी वाढत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. अचानक तपासण्या, लेखापरीक्षण आणि संबंधित रुग्णालयांची कागदपत्रे तपासून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा अशा कमिशन ऑन टेस्ट पद्धतीला अधिक खतपाणी मिळेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त




### मोटारीची पिकअपला धडक; मद्यपी चालक अटक

**पिंपरी, ता. २१ :** भरधाव वेगातील मोटारीने पिकअपला पाठीमागून धडक दिली. या अपघातात दोन जण जखमी झाले. हा अपघात मुंबई - बंगलोर महामार्गावर बावधन येथे सोमवारी (ता. १६) रोजी मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास घडला. स्वप्नील उर्फ रोशन बाळासाहेब पिंगळे (वय २६, रा. कोथरूड, पुणे, मूळ रा. धाराशिव) असे अटक आरोपीचे नाव आहे. नीलेश अरविंद गायकवाड (वय-३९, रा. सातारा) असे पिकअप चालकाचे नाव असून त्यांनी मंगळवारी (ता.१७) याबाबत बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीने मद्यप्राशन करून मोटार भरधाव वेगात चालवत वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केले. त्याने पिकअपला पाठीमागून धडक दिली. अपघातात पिकअप पलटी होऊन त्यातील कलिंगडांचेही मोठे नुकसान झाले. तसेच दोघेजण जखमी झाले.

### भाड्याचा वाद, प्रवाशाच्या बोटाचा चावा

**पिंपरी, ता. २१ :** रॅपिडो बुकिंगच्या भाड्यावरून झालेल्या वादातून चालकाने प्रवाशाला मारहाण करत त्याच्या बोटाचा चावा घेतल्याची घटना सोमवारी (ता. १६) रोजी दुपारी पावणे चार वाजताच्या सुमारास हिंजवडीतील ब्लू रिज सोसायटी परिसरात घडली. संदीप दगडू काळे (वय ३०, रा. साई प्रसाद सोसायटी, अंबाई माता रोड, धायरी, पुणे) असे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. अनुराग किशोर विश्वनाथ भगत (वय-४२, रा. नाना पेठ, पुणे) असे जखमी प्रवाशाचे नाव असून त्यांनी मंगळवारी (ता. १७) याबाबत हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी ऑनलाइन पद्वारे वाहन बुक केले असता भाड्यावरून आरोपीसोबत वाद झाला. संतापलेल्या आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करत मारहाण केली. त्यांच्या हाताच्या करंगळीला चावा घेत गंभीर जखमी केले.

### दापोडीत तरुणावर कोयत्याने वार




**पिंपरी, ता. २१ :** पाण्याचा जार आणण्यासाठी जात असताना एका तरुणावर डोक्यात कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी (ता. १६) रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास दापोडीतील गुलाबनगर परिसरात घडली. रोहित उर्फ झुणझुण्या अशोक गुजरे (वय-१९, रा. महादेव मंदिराशेजारी, दापोडी गावठाण, दापोडी) असे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तुषार तुकाराम चाराकटले (वय २४, रा. सिद्धार्थ नगर, लकी होम टीव्ही शोरूम मागे, दापोडी) असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्यांनी मंगळवारी (ता. १७) याबाबत दापोडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले.

### चिंचवडमध्ये कोयता जप्त; तरुणास अटक

**पिंपरी, ता. २१ :** बंदी आदेश असतानाही कोयता जवळ बाळगणाऱ्या एका तरुणास पोलिसांनी अटक केली. ही कारवाई मंगळवारी (ता.१७) रोजी सायंकाळी सव्वासहा वाजताच्या सुमारास वाल्हेकरवाडी, चिंचवड येथे करण्यात आली. संग्राम समीर येळवंडे (वय-२२, रा. दत्तनगर, थेरगाव) असे गुन्हा दाखल करून अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस अंमलदार लहू पाटील यांनी मंगळवारी (ता. १७ ) याबाबत चिंचवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनाई आदेश लागू असताना आरोपीकडे १०० रुपये किमतीचा विनापरवाना लोखंडी कोयता आढळून आला. त्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू बाळगणाऱ्या एकावर गुन्हा

**पिंपरी, ता. २१ :** बेकायदेशीररीत्या दारूचा साठा ठेवून विक्री करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मंगळवारी (ता. १७) रोजी दुपारी पावणे चार वाजताच्या सुमारास चाकण - शिक्रापूर महामार्गावर भोसे गावच्या हद्दीत करण्यात आली. भगवान रामभाऊ शेवाळे (वय-४५, रा. भोसे, ता. खेड, जि. पुणे) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस अंमलदार केशव घोटकर (वय-३६) यांनी चाकण दक्षिण पोलिस ठाण्यात मंगळवारी (ता.१७) याबाबत फिर्याद दिली आहे. आरोपीकडून सुमारे १४ हजार ४३५ रुपये किमतीचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. हा साठा विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या ठेवण्यात आला होता.

# भोंदू बाबासोबत त्यांच्या राजकारणात असलेल्या भक्तांवरही कारवाई झाली पाहिजे

## उद्धव ठाकरे यांची मागणी

**मुंबई, ता. २१ :** शिवसेना आणि स्थानीय लोकाधिकार समितीतर्फे सुरू होणाऱ्या एक्सपोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टिक कोर्सचा शुभारंभ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर शिवसेना भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी या कोर्सचे महत्त्व सांगितले. तसेच राज्यातील एपस्टीन म्हणून गाजत असणाऱ्या अशोक खरात प्रकरणाचा उल्लेख करत राज्यातील राजकारण अजून किती खालच्या पातळीवर नेणार आहात? असा संतप्त सवालही त्यांनी केला.

महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायदा आहे. तरीही अशा गोष्टी राज्यात घडत आहेत. राज्याचे राजकारण अजून किती खालच्या पातळीवर नेणार आहे, असा प्रश्न उपस्थित राहतो. महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायद्याचे पालन करणारेच भोंदू बाबाच्या नादी लागणार असतील तर अशा बाबांसोबत त्यांच्या राजकारणात असलेल्या भक्तांवरही कारवाई झाली पाहिजे. या गंभीर विषयांवरून महाराष्ट्राच्या एपस्टीन प्रकरणावरून कोणाचेही लक्ष उडू नये, यासाठी दुसरा विषय सुरू होऊ नये. त्यामुळे जादूणा विरोधी कायद्याचे कठोरतेने पालन होणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

अनेक नेते आणि पुढारी यांचे भोंदू बाबासोबतचे फोटो उघड झाले आहेत. त्यामुळे कर्तृत्वशून्य नेत्यांना असे मार्ग अंवलंबावे लागतात, हेच यातून दिसून येते. त्यांना अशा भाकड



आणि भोंदूगिरीचा आसरा घ्यावा लागतो. असे नेते भोंदू आणि भाकड आहेत, त्यांचे काहीच कर्तृत्व नाही, हेच दिसत आहे. यातील दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. एक सगळ्यांच्या पापावर पांघरून घालणारे खाते मुख्यमंत्र्यांनी सुरू करावे आणि त्यांनी ते खाते स्वतःकडेच ठेवावे, असा टोलाही त्यांनी हाणला.

हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष २३ जानेवारीपासून सुरू झाले आहे. मराठी माणसांसाठी आणि भूमिपुत्रांसाठी शिवसेना एक पाऊल पुढे टाकत आहे, असे आपण जाहीर केले होते. गेल्या ६० वर्षांपासून अनेक क्षेत्रात मराठी माणसाला, स्थानिक भूमिपुत्रांना दरवाजे बंद होते. त्यासाठी शिवसेनेने अनेक आंदोलने केली. स्थानीय लोकाधिकार, भारतीय कामगार सेना, बँक कर्मचारी सेना अशा अनेक सेनांची स्थापना केली. मराठी माणसासाठी आंदोलने करत तरुणांसाठी प्रशिक्षण वर्गही सुरू केले. आंदोलन केल्यानंतर त्या ठिकाणी नोकरी आणि रोजगाराची संधी उपलब्ध झाली तर त्यासाठी कुशल तरुण आपल्याकडे पाहिजे, त्यासाठी हे प्रशिक्षण वर्ग सुरू केले. त्या जागांसाठी पात्र होण्यासाठी तरुणांनी शिक्षण देणे, या हेतूने हे वर्ग सुरू केले. आता काळ बदलत आहे. आताच्या काळात एक्सपोर्ट- इम्पोर्ट, त्याला लागणारे लॉजिस्टिक हे मोठे क्षेत्र तयार झाले आहे. नवनवे एअरपोर्ट, पोर्ट तयार होत आहे. तिथे अनेक संधी निर्माण होत आहेत. त्या संधी आपण गमवता कामा नये. हे सर्व तज्ज्ञ आहेत. या क्षेत्रात अनेक वर्ष कार्यरत आहे. ते तरुणांना या क्षेत्रात संधी देऊ शकतात. त्यासाठी कुशल तरुणांची गरज आहे. त्यासाठी शिवसेना आणि लोकधिकार समितीतर्फे याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सुरुवातील प्रवेश परीक्षा घेत २५-३० जणांची बॅच असेल. त्यांना पमाणपत्र मिळाल्यावर त्यांना नोकरीची संधी हमखास मिळणार, अशा प्रकारे त्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे.

### द्रुतगती मार्गावर अफु जप्त; तरुण अटकेत

**पिंपरी, ता. २१ :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वडगाव महामार्ग कार्यालयासमोरील परिसरात अफुची तस्करी करणाऱ्या राजस्थानमधील तरुणाला पोलिसांनी मंगळवारी अटक केली.


त्याच्याकडून सात लाख ८४ हजार रुपयांचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. ही कारवाई मंगळवारी (ता. १७ मार्च) रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास करण्यात आली.

रोशनलाल नारायणलाल जाट (वय-२५, रा. चित्तोडगड, राजस्थान) असे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मालमत्ता गुन्हे विरोधी पथकातील पोलिस हवालदार नितीन लोखंडे यांनी मंगळवारी (ता. १७) याबाबत शिरगाव परंदवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीकडून सुमारे ९८० ग्रॅम वजनाचा अफु जप्त करण्यात आला.

# ‘सेक्स रॅकेट’ व ‘ड्रग्ज’साठी तीन महिन्यांत नवीन नियमावली लागू होणार

**पुणे, ता. २१ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या आयटी आणि शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये स्पा आणि वेलनेस सेंटरच्या आड सुरू असलेल्या संशयास्पद आणि अनैतिक प्रकारांवर आता थेट विधान परिषदेत चर्चा झाली आहे. गेल्या काही दिवसांत अशा केंद्रांबाबत वाढलेल्या तक्रारींमुळे हा मुद्दा गंभीर बनला असून, आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात यावर जोरदार आवाज उठवला.

गोरखे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या तरुणांना या स्पा सेंटरच्या माध्यमातून चुकीच्या मार्गावर ओढले जात आहे. त्यांच्या मते, ही केंद्रे केवळ मसाज किंवा वेलनेसपुरती



मर्यादित नसून, काही ठिकाणी अमली पदार्थांची देवाणघेवाण आणि मानवी तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांशी संबंधित जाळे कार्यरत आहे. त्यामुळे या संपूर्ण व्यवसायावर नियंत्रण आणण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी महत्त्वाचे आश्वासन दिले आहे. येत्या ३ महिन्यांत स्पा व्यवसायासाठी स्वतंत्र आणि कडक नियमावली लागू केली जाईल, असे त्यांनी सांगितले. यासाठी नगरविकास आणि ग्रामविकास विभागाचा सविस्तर अहवाल मागवण्यात आला असून, परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी विशेष समितीही स्थापन करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड परिसरात काही संघटित गट या व्यवसायाच्या आड मोठे जाळे चालवत असल्याचेही चर्चेत आले. या प्रकरणात काही विशिष्ट टोळ्यांची नावे सभागृहात घेण्यात आली असून त्यांच्या मालमत्तांची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सरकारकडून तयार होत असलेल्या नव्या नियमावलीत सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करणे, कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी, अंतर्गत रचनेत पारदर्शकता आणि कामकाजासाठी वेळेची मर्यादा घालणे यांसारखे कठोर निकष असण्याची शक्यता आहे. या उपाययोजनांमुळे स्पाच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर मोठ्या प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भानू अथैय्या : साधनेतून सन्मानाकडे कार्यक्रमाचे २७ मार्च रोजी आयोजन

**मुंबई, ता. २१ :** सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने भारतीय चित्रपटसृष्टीतील ऑस्कर अकॅडमी पुरस्काराने गौरविलेल्या प्रख्यात वेशभूषाकार भानू अथैय्या यांच्या जीवनकार्याला अभिवादन करण्यासाठी भानू अथैय्या : साधनेतून सन्मानाकडे या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता रवींद्र नाट्य मंदिर मुंबई येथे होणार आहे. या कार्यक्रमामध्ये गीत, संगीत, नृत्य, दृकश्राव्य सादरीकरण आणि निवेदनाच्या माध्यमातून भानू अथैय्या यांच्या कलाप्रवासाचा व त्यांच्या यशोगाथेचा उलगडा करण्यात येणार आहे. भानू अथैय्या यांनी आपल्या कारकिर्दीत १०० हून अधिक चित्रपटांसाठी वेशभूषा रचना केली असून, त्यांच्या कामात भारतीय परंपरा, सूक्ष्म अभ्यास आणि ऐतिहासिक अचूकता यांचा उत्कृष्ट संगम दिसून येतो. सन १९८३ मध्ये गांधी या चित्रपटासाठी त्यांना ऑस्कर पुरस्कार प्राप्त झाला होता. ऑस्कर जिंकणाऱ्या पहिल्या भारतीय होत्या. त्यांच्या कलेमुळे भारतीय चित्रपटसृष्टीला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली. या कार्यक्रमात उर्मिला कानेटकर, वैदेही परशुरामी, मानसी नाईक, भार्गवी चिरमुले, किन्नरी दामा, सुकन्या काळन, अभिनय बेर्डे, नकुल घाणेकर, अभिजित ठाकूर तसेच मंगला खाडिलकर यांसारख्या कलाकारांचा सहभाग असणार आहे. कार्यक्रमाचे नृत्य दिग्दर्शन सुभाष नकाशे व मिनल भिके यांनी केले असून, संहिता लेखन डॉ. सुवर्णा यांनी केले आहे.

# रेमंडचे मालक गौतम सिंघानियांचा मालदीवमध्ये भीषण अपघात

## समुद्रात स्पीडबोट उलटली; एअरलिफ्ट करून तातडीने मुंबईत दाखल

**मालदीव, ता. २१ :** रेमंड ग्रुपचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया यांना मालदीवमध्ये झालेल्या बोट अपघातात दुखापत झाली असून त्यांच्यावर सध्या मुंबईत उपचार सुरू आहेत. गुरुवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास फेलिधू परिसरात त्यांची स्पीडबोट समुद्रात पलटल्याची घटना घडली. अपघातानंतर तातडीने बचावकार्य हाती घेण्यात आले आणि सिंघानिया यांना एअरलिफ्ट करून मुंबईत आणले.

या बोटीत सिंघानिया यांच्यासह एकूण ७ जण होते. अपघातानंतर काही जणांना वाचवण्यात यश आले असले तरी एक भारतीय नागरिकासह २ जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. समुद्रात शोधमोहीम सुरू



असून स्थानिक यंत्रणा त्यांचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे पर्यटनस्थळांवरील सुरक्षा आणि खासगी जलवाहतुकीच्या नियमांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

गौतम सिंघानिया हे भारतातील नामांकित उद्योगपतींपैकी एक असून रेमंड ग्रुपचे नेतृत्व करत आहेत. सुमारे११०००कोटीरुपयांच्यासंपत्तीचेते मालक मानले जातात. कपड्यांच्या क्षेत्रात रेमंड हे एक प्रतिष्ठित नाव असून सूटिंग-शर्टिंगपासून डेनिम, कन्झ्युमर केअर, इंजिनिअरिंग आणि रिअल इस्टेटपर्यंत कंपनीचा विस्तार आहे. भारतीय तयार कपड्यांच्या बाजारात रेमंडने दीर्घकाळ आपली मजबूत पकड राखली आहे. या अपघाताने उद्योगक्षेत्रासह व्यावसायिक जगतातही खळबळ उडवली आहे. परदेशात सुटीसाठी गेलेल्या उद्योगपतीला अशा प्रकारे अपघाताला सामोरे जावे लागणे ही बाब अनेकांसाठी धक्कादायक आहे. समुद्रातील ॲक्टिव्हिटीज करताना सुरक्षा उपायांचे पालन किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, सिंघानिया यांच्या प्रकृतीवर डॉक्टर लक्ष ठेवून असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

## समलैंगिक संबंधांना विरोध; २१ महिन्यात दोन अल्पवयीनांची हत्या, २२ वर्षीय तरुणाला अटक

**पुणे, ता. २१ :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील दहिवडी येथील मांजरेवस्तीमध्ये गेल्या २१ महिन्यांपासून गूढ राहिलेल्या दोन बालकांच्या मृत्यूचे रहस्य अखेर उलगडले असून या प्रकरणाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. सुरुवातीला बिबट्याच्या हल्ल्याचा संशय व्यक्त करण्यात आलेल्या या दोन्ही घटनांमागे प्रत्यक्षात एका व्यक्तीचा थरारक गुन्हेगारी कट असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

२१ जून २०२४ रोजी एका १० वर्षांच्या मुलाचा मृतदेह शेतात आढळला होता. त्याच्या डोक्यावर गंभीर जखमा असल्याने सुरुवातीला हा बिबट्याचा हल्ला असल्याचा कयास लावण्यात आला. परिसरात त्या काळात बिबट्याची दहशत असल्याने हा निष्कर्ष सहज मान्यही झाला. मात्र वन विभागाने सुरुवातीपासूनच हा प्रकार वन्य प्राण्याचा नसल्याचे



स्पष्ट केले होते. तरीही पोलिसांनी त्या दिशेने गांभीर्याने तपास न केल्याचे आता समोर येत आहे. रक्ताच्या नमुन्यांमध्ये कोणताही वन्य प्राण्याचा अंश नसतानाही तपास पुढे सरकला नाही. या प्रकरणाला खरे वळण मिळाले ते १९ मार्च २०२५ रोजी. त्याच परिसरात आणखी एका बालकाचा मृतदेह आढळल्याने ग्रामस्थ संतप्त झाले. दोन्ही घटनांमध्ये साम्य असल्याने त्यांनी थेट खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत पोलिसांवर दबाव आणला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची दिशा बदलली आणि संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. तपासा दरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीने दोन्ही खुनांची कबुली दिली. धक्कादायक बाब म्हणजे, दोन्ही बालकांची हत्या एकाच पद्धतीने करण्यात आली होती. या कबुलीनंतर या प्रकरणातील सर्व धागेदोरे स्पष्ट झाले आहेत. सध्या आरोपीला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# पुण्यातील दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यात जमावबंदी आदेश लागू

**पुणे, ता. २१ :** पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यांमध्ये उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेत तात्पुरती जमावबंदी लागू केली आहे. शेतीसाठी कालव्यांमधून पाणी सोडण्याचा हंगाम सुरू होत असताना पाण्याच्या वाटपावरून वाद निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यासंदर्भात आदेश जारी केले असून विशेषतः खडकवासला मुठा-उजवा कालवा परिसरावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात या भागात पाण्याची टंचाई तीव्र होते. शेतीसाठी आवश्यक पाणी कमी पडत असल्याने कालवे आणि नद्यांमधून पाणी सोडण्याची व्यवस्था केली जाते. मात्र, पाणी उपलब्ध झाल्यानंतर त्याच्या वाटपावरून शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होण्याच्या घटना यापूर्वीही



घडल्या आहेत. काही वेळा हे वाद तणावपूर्ण स्वरूप धारण करत असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने आधीच खबरदारीचा उपाय म्हणून जमावबंदी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

या आदेशानुसार कालव्याच्या दोन्ही बाजूंना १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारचा जमाव करण्यास मनाई करण्यात आली आहे. दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यातील शेटफळगडे, अकोले, पारवडी, निरगुडे, कळस, लोणी देवकर, रावणगाव, नंदादेवी, मळद, शिर्सूफळ, गिरीम, गोपाळवाडी, माळवडी, मेरगळवाडी यांसह अनेक गावांमध्ये ही अंमलबजावणी होणार आहे. ही जमावबंदी पाणी सोडण्याच्या प्रक्रियेच्या सुरुवातीपासून ते पाणीपुरवठा पूर्णपणे थांबेपर्यंत लागू राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा निर्णय केवळ कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी नसून पाण्याचे नियोजनबद्ध आणि न्याय्य वितरण सुनिश्चित करण्यासाठीही आवश्यक मानला जात आहे.

एकूणच, वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संसाधनांचे व्यवस्थापन आणि सामाजिक समन्वय यांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा निर्णय असून, पुढील काही दिवस या भागातील परिस्थिती कशी राहते याकडे लक्ष लागले आहे.

# गांजा विक्री प्रकरणात करमाळ्यातील चौघे गजाआड; ७२ किलो गांजासह मोटार जप्त

**पुणे, ता. २१ :** सोलापूर जिल्ह्यातील करमाळा परिसरातून पुणे शहरात गांजा विक्रीसाठी आलेल्या चौघांना गुन्हे शाखेने अटक केली. त्यांच्याकडून ७२ किलो गांजा, मोटार असा १९ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. केसनंद-वाडेबोल्हाई रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. भिवा कालीदास वाघमोडे (वय-३६), विष्णू भागवत वाघमोडे (वय-२८), हरी श्रीपती ढवळे (वय -३२), मनोज अनिल सुरवसे (वय-२९, चौघे मूळ रा. करमाळा, जि. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

गुन्हे शाखेच्या युनिट सातचे सहायक पोलीस निरीक्षक



मदन कांबळे आणि पथक हे पुणे-अहिल्यानगर रस्ता परिसरात गस्त घालत होते. त्या वेळी मोटारीतून चौघे जण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी ऋषीकेश ताकवणे यांना मिळाली. केसनंद-वाडेबोल्हाई रस्ता परिसरात पोलिसांनी सापळा लावला. पोलिसांनी मोटार अडवली. मोटारीतील चौघांची चौकशी सुरू केली. मोटारीच्या डिक्कीत एका पोत्यात किलो गांजा असल्याची माहिती चौकशीत पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी गांजा ठेवलेले पोते जप्त केले. आरोपींनी पुणे शहरात गांजा विक्रीसाठी आणल्याची माहिती पोलिसांना दिली.

आरोपीनी करमाळ्यातील घरात गांजा लपवून ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांचे पथक करमाळ्याला रवाना झाले. करमाळ्यातील धायखिंडी परिसरातील आरोपींच्या घरातून १४ किलो गांजा जप्त केला. पोलिसांनी या कारवाईत एकूण मिळून ७२ किलो गांजा, मोटार असा मुद्देमाल जप्त केला. आरोपी गांजा कोणाला विक्री करणार होते, याद्दष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख, उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट सातचे पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, सहायक निरीक्षक मदन कांबळे, सारंग दळे, ऋषीकेश ताकवणे, प्रशांत कापुरे, निलेश साळवे, निर्णय लांडे, विनायक साळवे, नेहा तापकीर, विनायक साळवे, नितीन घाडगे, बाळासाहेब तनपुरे यांनी ही कारवाई केली.

# भोरच्या साळवडेत ग्रामस्तरीय बैठकीत दोन गटांमध्ये वाद

## धक्काबुक्की दरम्यान बंदूक पडल्याने खळबळ

विशाल शिंदे




भोर, ता. २१ : भोर तालुक्यातील साळवडे गावातील विठ्ठल-रुख्माई मंदिरात झालेल्या ग्रामस्तरीय बैठकीत दोन गटांमध्ये वाद होऊन धक्काबुक्कीची घटना घडली. या घटनेदरम्यान एका व्यक्तीकडील बंदूक खाली पडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली असून, याप्रकरणी राजगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रमोद धोंडीबा भडाळे (वय २८, रा. साळवडे, ता. भोर) यांनी तक्रार दिली आहे. दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे १०:३० वाजण्याच्या सुमारास मंदिरात ग्रामस्तरीय बैठक सुरू असताना फिर्यादी व आरोपी निखील पांडुरंग तांबट यांच्यात पूर्वीच्या कारणावरून वाद झाला.

वाद चिघळल्याने निखील तांबट याने फिर्यादीला शिवीगाळ करत दमदाटी केली व धक्काबुक्की केली. झटापटीदरम्यान दोघे मंदिराच्या कोपऱ्यात गेले असताना निखील याच्या कमरेला असलेली सिल्वर रंगाची बंदूक खाली पडली. त्याचवेळी दुसरा आरोपी प्रथमेश संदीप तांबट याने ती बंदूक उचलून घटनास्थळावरून पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

याप्रकरणी निखील पांडुरंग तांबट व प्रथमेश संदीप तांबट (दोघे रा. साळवडे, ता. भोर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राजगड पोलीस स्टेशन करत आहे.

# अशोक खरातचं बिंग फोडणारा नीरज जाधव अखेर पोलिसांच्या ताब्यात



**नाशिक, ता. २१ :** नाशिक मध्ये गाजत असलेल्या कॅप्टन अशोक खरात प्रकरणात पोलिसांनी आणखी एक महत्त्वाची कारवाई करत या प्रकरणातील कळीचा दुवा मानला जाणारा नीरज जाधव याला ताब्यात घेतले आहे. नाशिक क्राइम ब्रांचच्या ताब्यात असलेल्या जाधवविरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पीडित मुलीला मॉर्फ केलेल्या व्हिडिओंचे स्क्रीनशॉट पाठवल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

या प्रकरणात नीरज जाधवची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कारण, कॅप्टन खरातच्या केबिनमधील सीसीटीव्ही फुटेज बाहेर येण्यामागे त्याचाच हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, डिसेंबर २०२५ मध्ये जाधवने खरातच्या नकळत कार्यालयातील सुमारे ५८ सीसीटीव्ही फुटेज मिळवले होते. या फुटेजमध्ये महिलांवरील कथित लैंगिक अत्याचारांचे दृश्य असल्याची माहिती समोर आली आहे. एकूण १०० हून अधिक महिलांचे व्हिडिओ असल्याचीही चर्चा आहे, ज्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

नीरज जाधव हा खरातच्या ओकस प्रॉपर्टीज कार्यालयात ऑफिस बॉय म्हणून काम करत होता आणि तो त्याच्या विश्वासातील व्यक्ती मानला जात होता. मात्र, त्याच व्यक्तीमुळे खरातच्या कथित कृत्यांचा भांडाफोड झाल्याचे चित्र आता समोर येत आहे. दुसरीकडे, अशोक खरातने जाधववर ब्लॅकमेलिंग आणि खंडणी मागितल्याचा आरोप केला असून, या संदर्भात जाधवसह मुंबई आणि पुण्यातील आणखी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातून खरातच्या आर्थिक साम्राज्याचाही उलगडा होत आहे. नाशिकच्या पाथर्डी आणि गौळाणे परिसरात मोठ्या प्रमाणात जमीन, कॅनडा कॉर्नर येथील आलिशान कार्यालय आणि सिन्नर-शिर्डी रोडवरील कोट्यवधींचा व्यवसाय अशा विविध माध्यमांतून त्याने मोठी संपत्ती उभी केल्याचे समोर आले आहे. यातील काही मालमत्ता पत्नी आणि मुलीच्या नावावर असल्याचेही तपासात उघड झाले आहे. तसेच, जवळच्या सहकाऱ्यांच्या आणि ओळखीच्या व्यक्तींच्या नावावर बेनामी मालमत्ता घेतल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. या सर्व घडामोडींमुळे प्रकरणाची व्याप्ती केवळ लैंगिक अत्याचारापुरती मर्यादित न राहता आर्थिक गुन्हे, ब्लॅकमेलिंग आणि संघटित गैरप्रकारांपर्यंत विस्तारत असल्याचे स्पष्ट होत आहे. नीरज जाधवच्या चौकशीतून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता असून, तपास यंत्रणांचे लक्ष आता या संपूर्ण जाळ्याचा उलगडा करण्यावर केंद्रित झाले आहे.

# शिरूर तहसील कार्यालयात कंत्राटी कर्मचाऱ्याला एसीबीने रंगेहाथ पकडले




**शिरूर, ता. २१ :** शिरूर तहसील कार्यालयात सातबारा व फेरफारच्या नकलांसाठी दोन हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी (ता. २०) सायंकाळी सापळा रचून कंत्राटी कर्मचाऱ्याला रंगेहाथ पकडले आहे. तसेच या कारवाईत एका खाजगी इसमालाही ताब्यात घेण्यात आले असून दोघांविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंत्राटी सुपरवायझर सुरज शरद थोरात (वय ३४) व महेश बाबुराव भोसले (वय ४५) असे लाच घेताना पकडण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी एका ३४ वर्षीय इसमाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या शिरूर तालुक्यातील घोटी मळा येथील वडिलोपार्जित जमिनीचे सातबारा व फेरफार उतारे मिळवण्यासाठी त्यांनी २७ फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयात अर्ज केला होता. यानंतर १२ मार्च रोजी अभिलेख कक्षात गेले असता त्यांची भेट कंत्राटी सुपरवायझर सुरज थोरात यांच्याशी झाली. संबंधित कागदपत्रांच्या नकलांसाठी थोरात यांनी दोन हजार रुपयांची मागणी केली होती. या लाचेच्या मागणीबाबत तक्रारदाराने १८ मार्च रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे लेखी तक्रार दिली. त्यानुसार २० मार्च रोजी करण्यात आलेल्या पडताळणीत थोरात यांनी पुन्हा दोन हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाले. तसेच महेश भोसले या खाजगी इसमाने थोरात यांना लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचेही पडताळणीत उघड झाले. यानंतर एसीबीने सापळा रचत शुक्रवारी सायंकाळी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास शिरूर तहसील कार्यालयात कारवाई केली. पंचांच्या उपस्थितीत थोरात यांनी तक्रारदाराकडून दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबी पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले. या घटनेनंतर भोसले यांनाही ताब्यात घेण्यात आले.

ही कारवाई अँटी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली, तर पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त भारती मोरे करीत आहेत. शिरूर तहसील कार्यालयातच लाचखोरीचा प्रकार उघडकीस आल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

# ‘भाड्याने’ कार घेऊन परस्पर विक्री; मांजरीतील तरुणाची गाडी बनावट कागदपत्रांद्वारे हडपली




**हडपसर, ता. २१ :** भाड्याने गाडी घेण्याच्या बहाण्याने एका व्यावसायिकाचा विश्वास संपादन करून त्याची चारचाकी कार भाड्यानी घेऊन तिची परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एकावर मांजरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चैतन्य विजय वाघमोडे (वय २९, धंदा व्यापार, घुले नगर लेन नं. ०४, स्वागत हॉटेल जवळ, मांजरी बु, पुणे) असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव आहे, तर मयूर लोंढे, रा. हडपसर, पुणे (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) असे फसवणूक करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मांजरी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी चैतन्य वाघमोडे यांनी आपली कार भाड्याने देण्यासाठी ‘जस्ट डायल’वर नोंदणी केली होती. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी आरोपी मयुर लोंढे याने त्यांना फोन करून ३००० रुपये प्रतिदिन दराने गाडी भाड्याने घेतली. सुरुवातीला काही दिवस त्याने नियमित पैसे पाठवून वाघमोडे यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर ८ नोव्हेंबर रोजी पुन्हा ‘८ ते १० दिवसांसाठी गाडी हवी आहे’ असे सांगून त्याने १० हजार रुपये रोख आणि १० हजार फोन-पे द्वारे देऊन गाडी नेली.

१२ डिसेंबरनंतर आरोपीने भाड्याचे पैसे देणे बंद केले आणि फोन उचलणेही टाळले. २ जानेवारी २०२६ रोजी गाडीचे लोकेशन सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी येथे दिसले. वाघमोडे आपल्या मित्रांसह तिथे पोहोचले असता, गाडी बालाजी थोरात नावाच्या व्यक्तीकडे असल्याचे समजले. तिथे सागर ढवळे आणि मयुर लोंढे यांच्याशी वाघमोडे यांचा मोठा वाद झाला. वाघमोडे यांनी ११२ नंबरवर फोन करून पोलिसांना बोलावले, मात्र तरीही त्यांना आपली गाडी मिळवता आली नाही. काही वेळातच आरोपींनी गाडीचे ‘जीपीएस’ लोकेशन बंद करून गाडी गायब केली.

दरम्यान, तपासादरम्यान मयुर लोंढे आणि सागर ढवळे यांनी फिर्यादीची कोणतीही संमती नसताना लहु ढवळे व सतीश कदम यांना ही गाडी विकली होती. त्यासाठी त्यांनी बनावट नोटरी कागदपत्रे तयार केली होती. उलट, आरोपी लहु ढवळे यानेच वाघमोडे यांच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन फसवणुकीचा बनाव रचला. आपली गाडी आणि लाखो रुपयांचे भाडे बुडाल्याने अखेर चैतन्य वाघमोडे यांनी मांजरी आणि टेंभुर्णी पोलिसांत धाव घेऊन सविस्तर जबाब नोंदवला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक उमेश रोकडे करीत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## दही-भात पोटाच्या आजारावर आहे रामबाण उपाय, जाणून घ्या खाण्याचे अगणित फायदे

आपल्या प्रत्येकाच्या घराघरांत आवडीने खाल्ला जाणारा दही-भात हा केवळ चविष्ट पदार्थ नाही, तर आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर असल्याचे तज्ज्ञ सांगतात. विशेषतः उन्हाळ्यात हा पदार्थ शरीराला थंडावा देण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतो. दहीमध्ये असलेले प्रोबायोटिक्स पोटातील चांगल्या बॅक्टेरियांची संख्या वाढवतात. त्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि गॅस, ॲसिडिटीसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

उन्हाळ्यात शरीरातील उष्णता वाढते. दही-भात खाल्ल्याने शरीराला नैसर्गिक थंडावा मिळतो आणि उष्माघात टाळण्यास मदत होते.

भातातून कार्बोहायड्रेट्स मिळतात, तर दहीतून प्रथिने, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे मिळतात. त्यामुळे हा पदार्थ शरीराला आवश्यक ऊर्जा देतो.

दहीतील चांगले बॅक्टेरिया रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. त्यामुळे संसर्गजन्य आजारांपासून बचाव होतो.

दही-भात हलका आणि पोटभर वाटणारा असल्यामुळे जास्त खाणे टाळले जाते. त्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

जुलाब, अपचन किंवा पोट बिघडल्यास डॉक्टरही हलक्या आहारात दही-भात खाण्याचा सल्ला देतात.

काही संशोधनांनुसार दहीमधील घटक मेंदूवर सकारात्मक परिणाम करतात, ज्यामुळे मूड सुधारण्यास मदत होते.

सर्दी-खोकला असल्यास रात्री दही-भात टाळावा
लॅक्टोज इंटॉलरन्स असलेल्या व्यक्तींनी काळजी घ्यावी
जास्त प्रमाणात खाल्ल्यास आळस येऊ शकतो

# अशोक खरातच्या आश्रमाला ठाकरेंच्या काळात ३९ लाख लीटर पाणी

**नाशिक, ता. २१ :** स्वतःला कॉस्मॉलॉजी एक्सपर्ट आणि मर्चंट नेव्हीचा कॅप्टन म्हणवून घेणाऱ्या तथाकथित ज्योतिष अशोक कुमार खरात याला नाशिक पोलिसांनी एका महिला अनुयायावर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली अटक केली. या अटकेनंतर केवळ खरातचेच चेहरे समोर आले नाहीत, तर राज्याच्या राजकारणातही मोठा भूकंप झाला आहे. खरातचे सत्ताधारी नेत्यांशी असलेले संबंध समोर आल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेत भोंदू बाबासह त्याच्या राजकीय भक्तांवरही कारवाई करा, अशी मागणी केली आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर

### उद्धव ठाकरे म्हणाले, चौकशी करा..



जोरदार टीका केली आहे. आणखी किती खालच्या पातळीवर महाराष्ट्राला नेणार आहोत. महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा आहे. पण त्या कायद्याचे पालन करणारेच अशा भोंदू बाबाच्या नादी लागणार असतील त्याच्या बरोबर भोंदू भक्तांवरही कारवाई झाली पाहिजे. राजकारणात जे भक्त दिसत आहेत त्यांच्यावरही कारवाई व्हायला हवी. कर्तृत्व शून्य असे नेते किंवा जे पुढारी आहे त्यांना असे मार्ग अबलंबवावे लागतात. ते स्वतः भाकड आणि भोंदू असल्याने त्यांना अशा भोंदूगिरीचा आसरा घ्यावा लागतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

**पाणी कुठपर्यंत मुरलं आहे ते कळू द्या**

अशोक खरातच्या मिरगाव येथील श्री शिवनिका संस्थानसाठी दारणा धरणातून पाणी देण्याचा निर्णय ठाकरे सरकारच्या काळात झाला. अशोक खरातच्या शिवनिका संस्थानसाठी दारणा धरणातून ३९ लाख लिटर पाणी देण्याच्या मंजुरीचा निर्णय ठाकरे सरकारच्या काळात झाला. यावरही उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली. तुम्ही सर्वांची चौकशी करा, पाणी कुठपर्यंत मुरलं आहे ते कळू द्या. जो गुन्हेगार असेल त्याला शिक्षा करा आणि जर पाणी वळवलं असेल तर ते पाणी कुठपर्यंत मुरलं आहे ते कळू द्या. फक्त ते कळल्यावर त्याच्यावर काही कारवाई झाली पाहिजे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

**राजकीय कनेक्शन आणि फोटोंमुळे खळबळ**

खरातला बेड्या पडताच सोशल मीडियावर त्याचे हाय-प्रोफाईल फोटो व्हायरल झाले आहेत. यामध्ये राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांचे खरातचे फोटो समोर आल्याने विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे. यानंतर रुपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

## सुप्रिया सुळेंच्या मुलीचा विवाह ठरला


**पुणे, ता. २१ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची नात आणि खासदार सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. रेवती सुळे आणि नागपूर येथील उद्योजक सारंग अरुण लखानी यांचा शुभविवाह २० जून रोजी मुंबईत पार पडणार असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा विवाहसोहळा मुंबईतील एका नामांकित ठिकाणी शाही थाटात होणार असून, पवार आणि लखानी कुटुंबाकडून जोरदार तयारी सुरू आहे. या सोहळ्याला राज्य आणि देशातील अनेक दिग्गज राजकीय नेते, उद्योगपती आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता आहे. लग्नानंतर मुंबईत भव्य स्वागत समारंभ होणार असून, वरपक्ष नागपूर येथील असल्याने नागपूरमध्येही खास रिसेप्शन आयोजित केले जाणार आहे. याशिवाय, राजधानी दिल्ली येथेही मोठा स्वागत सोहळा पार पडण्याची शक्यता आहे.

# भिगवण आणि तक्रारवाडी परिसरात १४ शेतकऱ्यांच्या मोटार केबलवर चोरट्यांचा डल्ला

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. २१ : इंदापूर तालुक्यातील भिगवण आणि तक्रारवाडी परिसरात उजनी धरणाच्या फुगवटा क्षेत्रातील पाण्यालगत बसवलेल्या मोटार पंपांच्या केबल चोरीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. एकाच रात्री तब्बल १४ शेतकऱ्यांच्या कॉपर केबल्स चोरट्यांनी लंपास केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

तक्रारदार ऋतिक विकास वाघ (वय २६, रा. तक्रारवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी धरणाच्या पात्रात बसवलेल्या



मोटार पंपाची सुमारे २०० फुट लांबीची कॉपर केबल चोरीला गेली आहे. १९ मार्च २०२६ च्या रात्री ११ वाजेपर्यंत ही केबल सुरक्षित होती, मात्र २० मार्च रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास हा चोरीचा प्रकार उघडकीस आला.

ऋतिक वाघ यांनी परिसरात शोध घेतला असता, त्यांच्यासह आसपासच्या इतर १३ शेतकऱ्यांच्याही केबल्स चोरीला गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली. यामध्ये भोलाराम शेलार, अमर घुमाळ, प्रवीण गुरव, गणेश चव्हाण, राजेंद्र चव्हाण, गोविंद चव्हाण, संजय भरणे, राजेंद्र घोलप, विक्रम शेलार, सुभाष कांबळे, अनिल वाघ, अविनाश वाघ आणि पोपट वाघ या शेतकऱ्यांचा समावेश आहे. चोरट्यांनी अत्यंत नियोजनपूर्वक हा प्रकार केल्याचा संशय आहे. प्रत्येक शेतकऱ्याची सुमारे २०० फुट लांबीची कॉपर केबल, ज्याची अंदाजे किंमत ८ हजार रुपये आहे, अशी एकूण सुमारे १ लाख १२ हजार रुपयांहून अधिक किमतीची वायर चोरीला गेली आहे प्राथमिक अंदाजानुसार २४ हजार रुपयांची नोंद असली तरी एकूण १४ शेतकऱ्यांचे नुकसान मोठे आहे. कॉपरला बाजारपेठेत मिळणाऱ्या वाढत्या किमतीमुळे ही चोरी झाल्याची चर्चा आहे. दरम्यान, आधीच अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे, त्यातच बाजारभावाअभावी शेतकरी आर्थिक अडचणीत आहे. आता केबल चोरीमुळे ऐन उन्हाळ्यात पाणीपुरवठा खंडित झाल्याने शेतीकामात मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

## सोन्या चांदीच्या भावात घसरण कायम


**मुंबई, ता. २१ :** आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम जगातील विविध क्षेत्रांवर पडताना दिसत आहे. सोने आणि चांदी यांच्या भावात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने घसरण होत आहे. गुढीपाडवाच्या शुभमुहूर्तावर देशभरात सोन्याच्या दरांत मोठी घसरली झाली होती. त्यामुळे नवीन वर्षाच्या शुभमूहर्तावर सोनं घेणाऱ्या सर्वसामान्य ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला.

ही घसरण अजूनही कायम असून, आजही सोने आणि चांदीचे दर घसरले आहेत. शुक्रवारी सोन्याच्या भावात ७ हजारांची घसरण झाली होती. आज शनिवारी सुद्धा सोन्याचे भाव जवळपास पंधरासे रुपयांनी घसरले आहेत.

आकडेवारीनुसार, सकाळी १०.३० वाजता राज्यातील मुंबईसह इतर शहरांमधील सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,४८,९०० रुपये इतका आहे. तर प्रति ग्रॅमचा भाव १४,८९० इतका आहे. घसरणीचा भाव पाहता मागील १० दिवसांत सोन्याचा भाव वधारला असल्याचे दिसते.

आकडेवारीनुसार, दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, जळगाव आदी शहरांमध्ये चांदीचा भाव प्रति किलो २,५४,९०० रुपये इतका आहे. सोने आणि चांदीचा भाव घसल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या २१ दिवसांपासून अमेरिका, इस्राइल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धामुळे जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. त्यामुळे सोने आणि चांदीच्या भावात कधी वाढ तर कधी घसरण होताना पाहायला मिळत आहे.



## चाकणकरांनंतर आता दीपक केसरकर यांचा राजीनामा घ्यावा : संजय राऊत

नाशिक, ता. २१ : भोंदू बाबा प्रकरणावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले असून शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी थेट शिंदे गटावर निशाणा साधला आहे. भोंदूबाबांशी संबंध असलेल्या मंत्र्यांना तत्काळ पदावरून दूर करा, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याला अटक झाल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. त्याच्यावर महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप असून त्याच्याकडून काही आक्षेपार्ह व्हिडिओही जप्त करण्यात आले आहेत.

या प्रकरणात काही राजकीय नेते आणि मंत्र्यांचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केसरकर यांच्या आमदारकीचा राजीनामा घेतला पाहिजे.

एकनाथ शिंदे जर पक्षाचे नेते असतील, त्यांचा जर अंधश्रद्धेवर विश्वास नसेल तर रुपाली चाकणकरांपाठोपाठी त्यांनी ताबडतोब या मंत्र्यांचा (केसरकर) राजीनामा घेतला पाहिजे.

यावर आता स्वत: दीपक केसरकर यांनी खुलासा केला आहे. ते म्हणाले कि, एका इशानेश्वर मंदिरामुळे अशोक खरातची ओळख झाली होती, तसेच अशोक खरात माझ्या ऑफिसमध्ये कधीही आलेला नाही, असं स्पष्टीकरण दीपक केसरकर यांनी दिलं आहे.

## कॅप्टन खरात प्रकरणावर छगन भुजबळांचा मोठा खुलासा

**नाशिक, ता. २१ :** नाशिकच्या सिन्नरमधील ज्योतिषी अशोक खरात याच्यावर बलात्काराचे गंभीर गुन्हे दाखल झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. या प्रकरणाचे पडसाद इतके उमटले की, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना अखेर आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. या संपूर्ण प्रकरणावर राज्याचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी अत्यंत महत्त्वाची आणि मार्मिक प्रतिक्रिया दिली आहे.

अशोक खरात हा स्वतःला अंकशास्त्रज्ञ आणि ज्योतिषी म्हणवून घेत असे. मात्र, त्याच्यावर महिलांच्या लैंगिक शोषणाचे आणि फसवणुकीचे आरोप झाल्यानंतर त्याचे खरे रूप समोर आले. खरातला सध्या २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात



आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, महिलांच्या हक्कासाठी लढणाऱ्या रुपाली चाकणकर यांचे खरातसोबतचे फोटो आणि त्याची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला. ज्या व्यक्तीवर महिलांच्या शोषणाचे आरोप आहेत, त्याच व्यक्तीसमोर नतमस्तक होणाऱ्या चाकणकरांच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आणि त्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

या प्रकरणावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले कि, माझे लोकही मला तिकडे जाण्याचा आग्रह करत होते, पण मी गेलो नाही. सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांनी काही बंधने पाळली पाहिजेत. चाकणकर तिथे वारंवार जात असल्याने त्यांना कुणीतरी विश्वासात घेतले असावे, परंतु अंधश्रद्धेपासून दूर राहणे हेच माझे मत आहे. चाकणकरांच्या राजीनाम्याबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, घटनात्मक पदाबाबतचा निर्णय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी चर्चे नंतर घेतला आहे. मात्र आता पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## दौंड तालुक्यात अवकाळी पाऊस अन् भीषण गारपीट

### आमदार राहुल कुल यांचे पंचनामे करण्याचे आदेश

**दौंड, ता. २१ :** गेल्या दोन दिवसांपासून दौंड तालुक्यात निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळाला. १८ आणि १९ मार्च रोजी झालेल्या अचानक अवकाळी पाऊस आणि भीषण गारपिटीने शेती पिकांचे अतोनात नुकसान केले आहे. हाताशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, या संकटाच्या काळात प्रशासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात पावसाचा आणि गारांचा जोर सर्वाधिक होता. विशेषतः यवत, यवत स्टेशन, उंडवडी, खामगाव, खानोटे, पिलानवाडी, दहीटने आणि राहू या गावांना भीषण



गारपिटीचा मोठा फटका बसला आहे. गारांमुळे शेतातील कांदा, पालेभाज्या, फळबागा आणि चारा पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके जमिनीदोस्त झाली असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

या भीषण परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार राहुल कुल यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी महसूल आणि कृषी विभागाला 'शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्वरित पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. बळीराजावर आलेलं हे संकट मोठं आहे, अशा वेळी त्वरित पंचनामे होणे गरजेचे आहे, असे आमदार राहुल कुल यांनी सांगितले आहे. आमदार राहुल कुल यांनी पुढे सांगितले कि, नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल लवकरात लवकर तयार करून तो शासनाकडे सादर करावा. तसेच बाधितांना शासनाकडून योग्य ती मदत आणि नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी त्वरित प्रयत्न करावे.

## घराबाहेर काढल्याचा राग मनात धरून महिलेवर चाकूने हल्ला; यवत पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा

**यवत, ता. २१ :** घराबाहेर काढल्याच्या रागातून महिलेच्या गळ्यावर आणि हातावर चाकूने वार करून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. गुरुवारी (ता. १९) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास नांदुर ता. दौंड हद्दीत घडली आहे. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंकीदेवी प्रल्हादकुमार पासवान वय वर्षे व्यवसाय मजुरी रा. नांदुर ता. दौंड जि.पुणे, मुळ गाव गोमीया जि. बोकारो राज्य झारखंड) असे हल्ला झालेल्या महिलेचे नाव आहे. तर राकेशकुमार योगेंद्र पासवान रा. नांदुर ता. दौंड पुणे, मुळ गोमीया बोकारो, राज्य झारखंड) असे हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पिंकीदेवी पासवान यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीवर खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पिंकीदेवी पासवान या नांदूर येथे मजुरी करून आपल्या कुटुंबासह राहतात. आरोपी राकेशकुमार पासवान हा देखील त्याच गावातील असून तो पिंकीदेवी यांच्यासोबत एकाच परिसरात राहत होता. काही दिवसांपूर्वी पिंकीदेवी यांनी आरोपीला रूममधून बाहेर काढले होते, ज्याचा राग त्याच्या मनात होता. गुरुवारी (ता. १९) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास, पिंकीदेवी या त्यांच्या राहत्या रूमच्या बाथरूमजवळ गेल्या होत्या. यावेळी आरोपी राकेशकुमारने तिथे येऊन त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तू मला घराबाहेर का काढले? असे म्हणत त्याने जिवे मारण्याची धमकी दिली. वाद वाढत असतानाच आरोपीने स्वतःजवळील चाकू काढून पिंकीदेवी यांच्या गळ्यावर आणि हातावर सपासप वार केले.

दरम्यान, या हल्ल्यात पिंकीदेवी गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच यवत पोलिसांनी तातडीने धाव घेतली. पिंकीदेवी यांनी दिलेल्या जबाबानुसार, आरोपी राकेशकुमार याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०९ (खुनाचा प्रयत्न), ३५२, ३५१ (२), (३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उप निरिक्षक अक्षय मोरे करीत आहेत.

# 'सिक्युरिटी' म्हणून ठेवलेली ५ लाखांची कार हडपली; थेऊर येथील तरुणा विरोधात गुन्हा

**लोणी काळभोर, ता. २१ :** आईच्या उपचारासाठी उसने घेतलेल्या पैशांच्या बदल्यात दिलेली ५ लाख रुपये किमतीची 'मारुती स्विफ्ट' कार मित्राने आणि त्याच्या ओळखीच्या व्यक्तीने संगनमत करून हडपल्याचा धक्कादायक प्रकार फुरसुंगी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी थेऊर येथील एका तरुणावर फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नरेंद्र विनायक दाभाडे (वय-३३, रा. ग्रीन पार्क, फुरसुंगी) असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर हर्षल कुमावत, रा. थेऊर, ता. हवेली असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी




नरेंद्र दाभाडे यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नरेंद्र दाभाडे हे एका नामांकित लॉजिस्टिक कंपनीत 'सीनिअर स्पेशालिस्ट डेव्हलपर' म्हणून कार्यरत आहेत. ५ मार्च २०२६ रोजी त्यांच्या आईची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना तातडीने १ लाख रुपयांची गरज होती. त्यांनी आपला मित्र सौरभ गलांडे याच्याकडे मदत मागितली. सौरभने माझ्याकडे पैसे नाहीत, पण माझा मित्र हर्षल कुमावत तुला पैसे देऊ शकतो, असे सांगून त्यांना भेकराईनगर येथील एका बँकेसमोर भेटीसाठी बोलावले.

यावेळी हर्षल कुमावत याने पैसे देण्याची तयारी दर्शवली, मात्र 'सिक्युरिटी' म्हणून नरेंद्र यांची मारुती सुझुकी स्विफ्ट कार आणि आरसी बुक स्वतःकडे ठेवण्याची अट घातली. आईच्या उपचारासाठी पैशांची अत्यंत गरज असल्याने नरेंद्र यांनी आपली ५ लाख रुपये किमतीची लाल रंगाची कार हर्षलच्या ताब्यात दिली. हर्षलने सायंकाळपर्यंत १ लाख रुपये ऑनलाईन पाठवतो, असे आश्वासन दिले होते.

त्याच दिवशी दुपारी नरेंद्र यांची इतर नातेवाईकांकडून पैशांची सोय झाली. त्यामुळे त्यांनी तात्काळ सौरभला फोन करून आता मला हर्षलच्या पैशांची गरज नाही, माझी गाडी परत मागवून घे, असे सांगितले. हर्षलने फोनवर दुपारी ४ वाजेपर्यंत गाडी आणून देतो, असे सांगितले, पण त्यानंतर त्याने टाळाटाळ सुरू केली. उद्या देतो अशी खोटी आश्वासने देऊन त्याने १३ दिवस उलटले तरी गाडी परत केली नाही.

दरम्यान, आपली गाडी परत मिळत नाही आणि हर्षल कुमावत केवळ तारखा देत आहे, हे लक्षात आल्यावर नरेंद्र दाभाडे यांनी आपली फसवणूक झाल्याचे ओळखून फुरसुंगी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीची कार आणि आरसी बुक हडपल्याप्रकरणी हर्षल कुमावत याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार हरिदास कदम करीत आहेत.